# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०६.२०२४

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (२२.०६.२०२४ ते २८.०६.२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२९.०६.२०२४ ते ०३.०७.२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | दिनांक | २९ | ३० | ०१ | ०२ | ०३ |
| २.८ | १.० | ०.० | ०.० | ३.८ | ५.६ | ६.० | पाऊस (मिमी) | २५ | २० | २२ | २५ | २० |
| २९.५ | २९.५ | २९.५ | ३०.० | २८.५ | २८.५ | २६.५ | कमाल तापमान (अं.से.) | २६ | २९ | २८ | २७ | २६ |
| २३.० | २३.० | २२.५ | २२.५ | २३.५ | २२.५ | २१.५ | किमान तापमान (अं.से.) | २१ | २१ | २१ | २० | २० |
| ८ | ८ | ३ | ३ | ८ | ८ | ८ | स. ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ८ | ४ | ६ | ८ | ८ | ८ | ४ | दु. ढग स्थिती (आकाश) | | | | | |
| ९६ | ९६ | ९६ | ९६ | ९८ | १०० | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८६ | ८५ | ८५ | ८५ | ८६ |
| ८१ | ८१ | ८५ | ८८ | ८५ | ८५ | ९० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७९ | ७५ | ७९ | ८१ | ८० |
| २.६ | १.९ | २.० | १.९ | ३.४ | २.८ | २.० | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १९ | १९ | १८ | २० | २१ |
| द.नै | द.नै | द.नै | प.नै | प.नै | प.वा | प.नै | स. वाऱ्याची दिशा | प.नै | प.नै | प.नै | प.नै | प.नै |
| द.नै | प.नै | प.नै | प.नै | प.नै | प.वा | - | दु. वाऱ्याची दिशा | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२४ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२४ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| १९.२ | २००.३ | १७ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २९ जून ते ३ जुलै दरम्यान आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २९ जून व २ जुलै रोजी बऱ्याच ठिकाणी मध्यम स्वरुपाच्या पावसाची तर दिनांक ३० जून तसेच १ आणि ३ जुलै रोजी काही ठिकाणी मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक ३ जुलै पर्यंत कमाल तापमान २६.० ते २९.० अंश सेल्सिअस** दरम्यान तर किमान तापमान २०.० ते २१.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८५ ते ८६% तर दुपारची सापेक्ष आद्रता ७५ ते ८१% दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी १८ ते २१ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ३० जून ते ६ जुलै दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त तसेच कमाल तापमान व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान ईशारा | | ➢ **कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये घाट भागात दिनांक २८ जून व १ जुलै रोजी रोजी तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | ❖ **आजारा, भुदरगड, चंदगड, गडहिंग्लज, गगनबावडा, हातकणंगले, राधानगरी व शाहुवाडी तालुक्यांमध्ये ज्या ठिकाणी पुरेसा पाऊस झालेला आहे (७५ ते १०० मिमी) अश्या ठिकाणी वाफसा असल्यास शेतकरी बांधवांना पेरणी करता येऊ शकते.** |
| संदेश | | ➢ **कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये घाट भागात दिनांक २८ जून व १ जुलै रोजी तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बंधूनी स्वतःची व आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी.** |
| भात | रोपवाटिका | ➢ रोपवाटीकेमधील रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसानी प्रती गुंठा ५०० ग्रॅम नत्र द्यावे. |
| खरीप ज्वारी | पेरणी | ➢ नैऋत्य मान्सूनचा चांगला पाऊस झालेला असल्यास पेरणी करून घ्यावी. पाण्याची सोय असल्यास जूनच्या शेवटच्या आठवड्यात पेरणी करावी. लवकर पेरणी केल्यास खोडमशीचा उपद्रव कमी होतो.<br>➢ बीजप्रक्रिया : खरीप ज्वारीस १० किलो बियाण्यास २५ ग्रॅम अ‍ॅझोटोबॅक्टर किंवा अ‍ॅझोस्पिरीलम हे जिवाणू खत चोळावे. त्यामुळे १५ ते २० टक्के उत्पादन वाढते.<br>➢ रासायनिक खते: ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रती हेक्टरी पेरणीच्या वेळी द्यावे.<br>➢ खरीप हंगामध्ये ज्वारी पिकाची पेरणीसाठी पुढील वाणांची उपलब्धता करून घ्यावी.<br>➢ संकरीत वाण:सी.एस.एच.-५, सी.एस.एच.-९, सी.एस.एच.-१३, सी.एस.एच.-१४,<br>➢ सुधारित वाण४६२-.व्ही.पी.एस:, सी१३-.व्ही.एस., सी१५-.व्ही.एस.,पी८४-.व्ही.एस.एस :गोड ज्वारी .८०१-.के.व्ही., सी२४-.व्ही.एस., फुले वसुंधरा.हे वाण वापरावे (संकरीत) |
| मका | पेरणी | **बियाणे प्रमाण:** धाण्यासाठी – पेरणीकरिता एकरी ६ ते ८ किलो बियाणे तर चाऱ्यासाठी मका पेरणीकरिता एकरी ३० किलो बियाणे लागते.<br>**बीजप्रक्रिया:** पेरणीपूर्वी २ ते २.५ ग्रॅम थायरम हे बुरशिनाशक प्रती किलो बियाण्यास चोळावे. तसेच अ‍ॅझोटोबॅक्टर जीवाणू संवर्धन २५ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास चोळून नंतर पेरणी करावी. |
| सोयाबीन | पेरणीपूर्व तयारी | **बीजप्रक्रिया**<br>➢ जमिनीतून प्रसार होणाऱ्या रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रति किलो बियाणास कार्बोक्झीन ३७.५% + थायरम ३७.५% डी.एस. ३० ग्रॅम प्रति १० किलो बियाणास चोळावे त्यानंतर अझोक्सिस्ट्रोबीन २.५% + थायोफिनेट मिथाईल ११.२५% + थायोमिथोक्झाम २५% एफ.एस. १०० मिली किंवा थायोमिथोक्झाम ३०% एफ.एस. १०० मिली प्रति १० किलो बियाण्यास बीजप्रक्रीया करावी त्यामुळे खोड |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | माशी पासून रोपावस्थेत पिकाचे संरक्षण होईल.<br>**आंतरपिके**<br>➢ सोयाबीन + तूर (३:१) या प्रमाणात घ्यावे. |
| भुईमूग | पेरणीपूर्व तयारी | ➢ **बीजप्रक्रीया -** बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबीयम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक (घनरूप किंवा द्रवरूप) चोळावे बीजप्रक्रीया केलेले बियाणे सावलीत सुकवून पेरावे<br>**आंतरपिके**<br>➢ खरीप भुईमुग पिकात सोयाबीन, सुर्यफुल, मुग, उडीद व तूर हि आंतरपिके ६ :२ या प्रमाणात घेतल्यास अधिक आर्थिक फायदा होतो.<br>➢ पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी : भुईमुग+सोयाबीन (४:१) आणि कडेने एरंडीची लागवड (दोन ओळी) |
| उडीद | पेरणी | ➢ खरीप हंगामामध्ये मुग पेरणीसाठी खालील वाणांची उपलब्धता करून घ्यावी.<br>➢ पिकेव्ही ब्लॅक गोल्ड, विश्वास, फुले वसू आणि फुले राजन<br>➢ **बीजप्रक्रिया**<br>➢ पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर लावावी व त्यानंतर प्रत्येकी २५ ग्रॅम रायझोबियम व पीएसबी जीवाणूची पावडर गुळाच्या थंड पाण्यामध्ये मिसळून लावावी. मूग, उडीद या पिकांच्या बियाणासाठी चवळी गटाचे रायझोबियम जीवाणू संवर्धन वापरावे. |
| ऊस | वाढीची | ➢ हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्यांचा वापर करावा.<br>➢ ऊस पिकामध्ये तणनियंत्रण करावे. |
| आंबा | वाढीची | ➢ पावसाळ्यामध्ये पूर्ण वाढ झालेल्या आंबा झाडास दरवर्षी ५० कि. शेणखत, ७५० ग्रॅम नत्र (१.६२५ किलो युरिया) +५०० ग्रॅम स्फुरद ( ३.१२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) + ५०० ग्रॅम पालाश ( ८४० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश) जुलै महिन्यामध्ये पावसाची उघडीप पाहून द्यावे. |
| पशुधन | वाढीची | ➢ गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत. चिखल होवू देवू नये. हिरव्या चाऱ्याकरीता ज्वारी, बाजरी, मका यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याचबरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये यशवंत, मेथीघास यासारखी पिके घ्यावीत.<br>➢ साठविलेल्या सुक्या चाऱ्यावर पाणी पडून त्यात बुरशी लागली असेल तर असा चारा जनावरांना देऊ नये तो नष्ट करावा.जनावरांचे खाद्य / खाद्यघटक दमट आर्द्रता युक्त वातावरणात साठवू नयेत. त्यामध्ये भिंतीचा / जमिनीचा ओलसरपणा मुरणार नाही याची काळजी घ्यावी. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

**ठिकाण : कोल्हापूर**

**दि. : २८.०६.२०२४**

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**